**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Chhatrapati Sambhajinagar – 431 004, Maharashtra, India**
NAAC Re-accredited 'A+' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
Email- dyregistrar.acad@bamu.ac.in

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे **'अ+'** दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/संलग्न/पीबीजी/२०२६-२७/40 — दि. ०४-०६-२०२६.

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

विषय : **'एज्युकेशन एक्स्पो – प्रज्ञावेध २०२६' ला भेट देण्याबाबत व विद्यार्थ्यांमध्ये** सदर **माहितीचा प्रसार करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने दिनांक ५ व ६ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत विद्यापीठ नाटयशास्त्र विभागाच्या शेजारील नवीन नाटयगृहात **'एज्युकेशन एक्स्पो – प्रज्ञावेध २०२६'** चे आयोजन करण्यात आले आहे.

या एक्स्पोमध्ये विविध शैक्षणिक विभाग, संशोधनाच्या संधी, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, 'अ‍ॅप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP)', विद्यापीठ ग्रंथालय, बजाज इन्क्युबेशन सेंटर तसेच इतर विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तरी महाविद्यालयांच्या प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, आपण स्वतः तसेच आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व पालकांना सदर एक्स्पोला भेट देण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच या संदर्भातील माहिती महाविद्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करावी व विद्यार्थ्यांपर्यंत विविध माध्यमांतून पोहोचवावी, ही विनंती तसेच **एज्युकेशन एक्स्पो – प्रज्ञावेध २०२६'** मध्ये आपल्या महाविद्यालयाकडून सहभागी झालेल्या प्राध्यापक, विद्यार्थी व पालकांची माहिती acadsection@bamu.ac.in या इमेल वर पाठविण्यात यावी.

विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, संशोधन व कौशल्याधारित अभ्यासक्रमांविषयी मार्गदर्शन मिळण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

सोबत:- निमंत्रण पत्रिका

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग

नॅकद्वारे पुनर्मूल्यांकित A+ श्रेणी प्राप्त

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## सस्नेह निमंत्रण

# ACADEMIC EXPO
DISCOVER. CONNECT. TRANSFORM.

# प्रज्ञावेध २०२६
ज्ञान, संधी आणि उज्ज्वल भविष्याचा संगम

**दिनांक: ०५-०६ जून २०२६ | वेळ: सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०**

**एक विद्यापीठ. अनेक संधी.
अमर्याद शक्यता.**

आपल्या विद्यापीठाने आयोजित केलेल्या ' प्रज्ञावेध -२०२६' या 'अकॅडमिक एक्सपो' साठी आपल्याला आमंत्रित करताना अत्यंत आनंद होत आहे. या प्रदर्शनाचा उद्देश विद्यापीठाच्या परिसरातील व उप परिसरातील शैक्षणिक कार्यक्रम, संशोधन उपक्रम, पायाभूत सुविधा आणि विविध शिक्षण संधी यांबद्दल थेट माहिती सर्वांना व्हावी हा आहे. यानंतर **सोमवार दि. ८ जून २०२६** रोजी 'ओपन डे' चे आयोजन करण्यात आले आहे. आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**स्थळ**

प्रदर्शनी हॉल, नाट्यशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**विनीत**

कुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर